# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ४१-२२** **दिनांक ०८/०२/२०२२**

## वसई येथील गंभीर दुखापतीसह जबरी चोरीच्या गुन्ह्याची उकल करण्यात गुन्हे शाखा कक्ष २ वसई यांना यश

दिनांक ०५/०२/२०२२ रोजी रात्रौ फिर्यादी ऑल्वीन रॉड्रीक्स, वय ४२ वर्षे, रा. मच्छी मार्केट जवळ, वसई (पश्चिम), ता.वसई जि. पालघर हे त्यांचे नाळे, नालासोपारा येथील टेलरींगचे दुकान बंद करुन मोटार सायकलवरुन घरी जात असतांना निर्मळ चर्च येथे एका इसमाने त्यांच्याकडे लिप्ट मागितल्याने सदर इसमास घेवुन वसई बाजुकडे निघालेले असताना रात्रौ ११.२० वा. च्या सुमारास भुईगाव डोंगरी येथील दत्त मंदिर जवळ आले असता सदर इसमाने फिर्यादी यांना मोटार सायकल थांबवण्यास सांगून तो त्याचे मित्रासोबत जाणार असल्याचे सांगितले त्यावेळी फिर्यादी यांनी मोटार सायकल थांबविली. तेव्हा तेथे एक मोटार सायकल चालक येवुन फिर्यादीचे बाजुला थांबला तेव्हा फिर्यादीचे मोटार सायकलवर पाठीमागे बसलेल्या इसमाने मोटार सायकल वरुन खाली उतरुन त्याचे खिश्यातील धारदार वस्तु काढुन फिर्यादीच्या गळयावर हातावर, डोक्यावर तसेच पायावर वार करुन फिर्यादीला गंभीर जखमी करुन त्यांच्या खिश्यातील पैसे हातातील अंगठया असे चिजवस्तु जबरीने चोरी करुन नेले बाबत वसई पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ३६/२०२२ भादविस कलम ३९४,३९७,३४ प्रमाणे गुन्हयाची नोंद झालेली आहे. सदर प्रकारच्या गुन्हयामुळे स्थानिक जनमानसात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

वरील गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हे शाखा कक्ष २ वसई पथकाने गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. तात्काळ गुन्हयातील फिर्यादी यांची कार्डीनल हॉस्पिटल बंगली, वसई, येथे भेट घेवून त्यांच्याकडे गुन्ह्याचे अनुषंगाने प्राथमिक विचारपूस करुन गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून फिर्यादी यांचे नाळा येथील टेलरिंग शॉपपासून ते घटनास्थळ पुढे हॉस्पिटलपर्यंतचे जवळपास ५० हून जास्त सी.सी.टि.व्ही. कॅमेरे चेक केले. परंतु फिर्यादी यांनी फिर्यादीमध्ये सांगितलेली घटना व प्राप्त सी.सी.टि.व्ही. फुटेजमध्ये तफावत आढळून आल्याने फिर्यादी यांना विश्वासात घेवून त्यांच्याकडे सदर घटनेच्या अनुषंगाने विचारपूस केली असता फिर्यादीचा मित्र ऋषीकेश चिलवंत रा.नाळा, डिसिल्वा नगर, नालासोपारा पश्चिम याचेशी दिनांक ५/२/२०२२ रोजी रात्रौ ९.३० वाजताचे

सुमारास वैयक्तीक वाद व पैशाच्या आर्थिक व्यवहारावरुन झालेल्या वादामुळे ऋषीकेश चिलवंत याने फिर्यादी यांस चाकुने गंभीर दुखपत केली त्यानंतर फिर्यादी यांचे मोबाईलचा वापर करून फिर्यादीच्या गुगल पे अंकाऊटवरुन आरोपीताने स्वतःचे गुगल पे अंकाउंटवर ३०,०००/- रुपये जबरदस्तीने ट्रान्सफर करुन घेतले व सदरची घटना कोणास सांगितल्यास फिर्यादीचे कुटुंबास जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे फिर्यादीने घाबरुन दिनांक ०५/०२/२०२२ रोजी कोणीतरी दोन अनोळखी इसमांनी त्यांना मारहाण करुन सोन्याचे दागीने व पैसे जबरीने चोरी भुईगाव डोंगरी रस्त्यावर केले बाबत हकीकत सांगीतली होती. त्यानुसार आरोपीत नामे ऋषीकेश चिलवंत, रा. नाळा, डिसिल्वा नगर, नालासोपारा पश्चिम यास नाळा परीसरातुन ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. त्याचेकडुन गुन्ह्यात चोरी केलेली मालमत्ता व वापरलेले हत्यार हस्तगत करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी ही डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २, वसई चे पोलीस निरीक्षक श्री. शाहूराज रणवरे, सहायक पोलीस निरीक्षक,श्री. रणजितसिंग परदेशी, श्री. सुहास कांबळे, श्री. ज्ञानेश्वर जगताप, पोहवा/ मंगेश चव्हाण, संजय नवले, रमेश भोसले, सचिन पाटील, पोना/ प्रशांत ठाकूर, जगदीश गोवारी, रमेश अलदर, प्रशांत पाटील, पोशि/ अमोल कोरे, सुधीर नरळे, दादा आडके यांनी केलेली आहे.

---000--